# *एफ. वाय. बी. ए. (सेमिस्टर – १ )*
# *विषय : मराठी साहित्य : कथा आणि भाषिक कौशल्यविकास*

*प्रा. डॉ. दत्तात्रय बाळासाहेब वेलजाळी*
*एम.ए.नेट, सेट, पीएच. डी.*
*(मराठी विभागप्रमुख, सिन्नर महाविद्यालय)*

## घटक - ३) भाषिक कौशल्यविकास

### अर्जित कौशल्य - २. वाचन कौशल्य :

### वाचन कौशल्याचे स्वरूप :

विविध ग्रंथांतील आणि पुस्तकांतील ज्ञान जाणून घेण्यासाठी आपण वाचन कौशल्याचा आधार घेतो. लिखित अक्षरातील मजकूर समजून घेण्यासाठी केलेली ती कृती असते. भाषालिपीचा परिचय झाल्यावर व्यक्तिमन लेखनास प्रवृत्त होते. मनातील विचार,अनुभव लेखक लिपिबद्ध करतो. वर्ण-अक्षरे-शब्द-वाक्य या आधारे भाषेची लिपी मूर्त स्वरूपात साकारते. लेखक आपल्या अमूर्त कल्पना शब्दांच्या माध्यमातून मूर्त रूपात मांडतो म्हणजेच लेखन करतो. त्याने मांडलेला विचार समजून घेण्यासाठी आपण वाचन या क्रियेकडे वळतो.

लेखन करताना लेखकाच्या समोर वाचक नसतो. तसेच वाचन करताना वाचकाच्या समोर लेखक नसतो. लेखक वाचक यांचा लेखनाच्या माध्यमातून परस्परांशी संबंध साधला जातो. लेखकाचे म्हणणे त्याच्या लेखनातून स्पष्ट होत असते. ते जाणून घेण्यासाठी वाचन करावे लागते. याचाच अर्थ लेखन-वाचन ही परस्परपूरक कौशल्ये आहेत. लेखन हे प्रथम लिहिले जाते म्हणून ती क्रियात्मक घटना ठरते. हस्तलिखित, छापील, संगणकीय टंकलेखन या स्वरूपात ते वाचकांच्या हाती येते. वाचकाचे काम ते वाचण्याचे व त्यातील आशय समजून घेण्याचे असते. म्हणून वाचन ही प्रतिक्रियात्मक घटना ठरते.

## वाचन कौशल्याची व्याख्या :

- ❖ लेखन कौशल्यातून साकारलेले अनुभवविश्व समजून घेण्यासाठी केलेली क्रिया म्हणजे वाचन होय.
- ❖ लेखनातील आशय डोळ्यांनी पाहून समजून घेणे म्हणजे वाचन होय
- ❖ विविध ग्रंथांतील ज्ञानग्रहण करण्यासाठी केलेली कृती म्हणजे वाचन होय
- ❖ लिखित अक्षरावरून शब्दबोध करीत आशय समजून घेण्यासाठी इच्छाशक्ती व डोळे यांचं साहाय्याने जाणीवपूर्वक केलेली कृती म्हणजे वाचन होय.
- ❖ वाचन म्हणजे छापलेल्या अक्षरांचा अर्थ लावून आशय समजून घेणे होय

## वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी उपाय :

- ✓ आपली शब्दबोध व अर्थबोध विषयक जाण विकसित करणे.
- ✓ वाचनाची दिशा डावीकडून उजवीकडे असते हे समजणे.
- ✓ वाचताना आशयावर लक्ष केंद्रित करणे.
- ✓ लेखनावर दृष्टिक्षेप टाकून त्यातील आशय चटकन ओळखणे.
- ✓ आशयाचे आकलन करून घेणे, त्यावर, मनन चिंतन करणे.
- ✓ लेखनातील अनावश्यक मजकूर, पुनरुक्ती, पाल्हाळ इत्यादी दोषांकडे दुर्लक्ष करून शीघ्र गतीने आशय शोधणे.
- ✓ शब्दसंग्रह, अर्थबोधनक्षमता, वाचनवेग, आकलनक्षमता विकसित करणे.

## वाचनाचे कौशल्याचे प्रकार :

१. **प्रकट वाचन –**

प्रकट वाचन म्हणजे मोठ्याने केलेले वाचन होय. हे वाचन स्वत:बरोबर इतरांसाठीही असते. ते जाहीरपणे केलेले वाचन असते.

२. **मूक वाचन –**

मूक वाचन म्हणजे मनातल्या मनात केलेले वाचन असते. ते स्वत:साठी असते. विद्यार्थ्यांना व अभ्यास करणाऱ्या अशा सर्वांना या प्रकारचे वाचन उपयोगी पडते.

३. **सहेतुक वाचन –**

काही विशिष्ट हेतू समोर ठेऊन केलेले वाचन म्हणजे सहेतुक वाचन होय. नवीन ज्ञान मिळविण्यासाठी, अभ्यासक्रम समजून घेण्यासाठी असे वाचन केले जाते.

४. **हलके फुलके वाचन –**

वर्तमानपत्रे, कथा-कादंबरी-कविता-नाटक असे साहित्य वाचन आपण करत असतो. हे वाचन वरवरचे व जलद प्रकारचे असते. विरंगुळा म्हणून केलेले हे वाचन असते, म्हणून त्यास हलके-फुलके वाचन असे म्हणतात. हे वाचन करमणूक म्हणून केले जाते. वेळ घालविणे हा त्यामागील हेतू असतो.

५. **ज्ञान व आनंद मिळविण्यासाठी केलेले वाचन –**

वाचनाचा हा सर्वश्रेष्ठ प्रकार मानला आहे. विशिष्ट लेखकांची पुस्तके आनंद देणारी असतात. ती आपण जाणीवपूर्वक वाचतो. नवे ज्ञान मिळावे, साहित्यातून जीवनदर्शन समजून घ्यावे यासाठी या प्रकारचे वाचन केले जाते.

## वाचनप्रक्रियेतील घटक :

- शब्दबोध -
- वाचनदिशा -
- पुनर्दृष्टिक्षेप -
- दृष्टीचा आवाका -
- शब्दोच्चारण -
- आकलन -
- आस्वादन -
- शब्दसंग्रह -

## वाचनाचे कौशल्याचे फायदे :

- वाचनाने व्यक्तीला ज्ञान मिळत असते.
- कोणत्याही विषयाचे वाचन हे आपणाला प्रेरणा देणारे असते.
- दु:ख, नैराश्य वैफल्य कठीण प्रसंग याला सामोरे जाण्यासाठी वाचन महत्त्वाचे असते.
- आपण सतत वाचन केल्यास बहुश्रुत होतो. वाचनाने अनेक विषयांचे ज्ञान अवगत होते.
- आपले विचार प्रगल्भ होतात. व लेखनशैलीचा परिचय होतो.
- मानवाला प्रत्येक गोष्टीची जिज्ञासा असते. वाचनाने आपली जिज्ञासापूर्ती होते.
- भाषाकोश, कल्पनाशक्ती, संस्कृती, परंपरा या घटकांची जोपासना होते.
- अद्भूत कथा, वीरकथा, विज्ञानकथा, यांचे वाचन केल्यास आपले या विषयाचे ज्ञान पूर्ण होत जाते.